# शरण सूरय्या

लेखक
शशिकांत बसवेश्वर दरगु मोदी

सिद्धी पब्लिकेशन हाऊस, नांदेड.

NANDI FOUNDATION

ISBN NO- 978-81-933436-2-3

शरण सूरय्या

लेखक
शशिकांत बसवेश्वर दरगु मोदी
सहा. प्राध्यापक, संस्कृत विभाग,
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

प्रकाशक
सिद्धी पब्लिकेशन हाऊस,
नांदेड–४३१ ६०५.
Ph. 02462-250389   Mob. 9623979067
**Email:** shrishprakashan2009@gmail.com
umbarkar.rajesh@yahoo.com

नंदी फाउंडेशन, जुना गंज, नांदेड–०४.
Nandi Foundation Publication series - 21
www.nandifoundation.com

मुद्रक
अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड

मुखपृष्ठ
तेजस रामपूरकर

आवृत्ती – प्रथम
सर्व हक्क लेखकाधीन
२८ एप्रिल २०१७ (अक्षयतृतीया)

किंमत ३०/–

# अनुक्रमणिका


| क्रं. | शीर्षक | पृष्ट |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ०४ |
| २. | शरण सूरय्या — जन्म व बालपण | ०८ |
| ३. | शिक्षण व युध्द्कौशल्य | १२ |
| ४. | अनुभवमंटपातील सेवा | १९ |
| ५. | कल्याणक्रांतीनंतर जंगमसेवा | २१ |
| ६. | नंदीग्राम येथे नंदी स्थापना | २३ |
| ७. | ऐक्य | २५ |

# १. प्रस्तावना

विश्वातील सर्वात प्राचीन व सर्वात समृध्द संस्कृती म्हणून भारतीय संस्कृती आपल्या समोर येते. या संस्कृतीने सर्व मानवाला मानवतेचा वास्तविक अर्थ प्रत्यक्ष क्रिया व ज्ञान यांच्या माध्यमातून विशद केला आहे. या संस्कृतीवर अतोनात आक्रमणे झाली, या आक्रमणामध्ये आप्त व परकीय अशी दोनही आक्रमणे होती. परंतु प्रत्येक वेळी संस्कृतीचे रक्षक या देशात जन्माला आले आहेत. त्यांना अवतार, महापुरूष असे संबोधले गेले. आज या संस्कृती रक्षकांचा इतिहास अभ्यासणे परमावश्यक आहे. त्यामूळे त्यांच्या जीवनाचा, कार्याचा परिचय होतो.

भारतीय संस्कृतीचा अभ्यास करताना प्रत्येक व्यक्ती, ग्राम, जनपद, नगर, प्रदेश या प्रत्येकांचे कार्य योगदान अलौकिक आहे. याच श्रृंखलेतील एक प्रसिध्द ग्राम म्हणजे 'नंदीग्राम'. माता गोदावरीच्या पावन स्पर्शाने पवित्र झालेले हे ग्राम. या भूमीला आज नांदेड म्हणून ओळखले जाते.

गोदावरीच्या उत्तर तटावरील नंदीग्राम हे एक पवित्र शिवोपासनेचे केंद्र होते. या ग्रामाला नंदीग्राम, नंदीकड, नंदीयाड, नंदीतट, नांदेय, नंदीकट, नांदीयाडी असे अनेक

नावे ऐतिहासिक नोंदीमध्ये आढळतात. परंतु सर्व नावांमध्ये 'नंदी' हा शब्द समान आहे, हे विशेष होय. नंदीग्राम येथील निवासी दरगु मोदी परिवाराकरीता 'नांदेय' हे विशेषण उपयोजिले आहे, हे 'नंदी' शब्दाचे तद्धित रूप होय. याचा अर्थ 'नंदीचे अपत्य' किंवा 'ज्यांचे गोत्र नंदी आहे' असे व्यक्ती किंवा कुटुंब होय. तर दरगु मोदी परिवाराचे गोत्र 'नंदी' हेच आहे. नंदी गोत्र असलेले 'नांदेय' व 'नांदेय' चे पूढे 'नांदेड' असे रूप परिवर्तन झालेले असावे. हा एक इतिहास संशोधनाचा विषय आहे. म्हणुन नांदेड हे एक या ग्रामाचे नाव आहे, जे आजही प्रचलित आहे. सामान्यतः नंदीग्राम व नांदेड ही दोनही नावे जी दरगु मोदी परिवाराशी संबधित आहेत, तीच सर्वमान्य व रूढ आहेत.

गोदानाभीस्थानाचे ठिकाण।
नंदीग्राम नामाभिधान।।
क्षेत्र थोर परम पावन ।
हल्ली नांदेड ज्या वदती।।

या पंक्तीतून नांदेडला 'नंदीग्राम' म्हणतात व गोदावरी नदीचे नाभिस्थान आहे, हे स्पष्ट होते.

बाराव्या शतकात विश्वामध्ये अद्भूत अपूर्व अशी क्रांती भारतातील कर्नाटकप्रांतात कल्याणनगरीत घडत होती. प्रथमच 'अनुभवमंटप' च्या रूपाने धार्मिक,

सामाजिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, आर्थिक, नैतिक इत्यादी सर्वक्षेत्रात जी वैचारिक, वैज्ञानिकदृष्टया जनभावनेच्या विचारातून सक्रिय सहभागातून घडलेला बदल आजही आश्‍चर्यकारक वाटतो. हे सर्व घडविणारे प्रेरक भक्तभंडारी महात्मा बसवण्णा व त्यांचे असंख्य शरण यांच्या श्रृंखलेत नंदीग्रामचा एक शरण सूरय्या यांचा सक्रिय असा सहभाग होता.

शरण सूरय्या यांचे वंशज नंदीग्राम (नांदेड) येथील जुना गंज भागातील ज्येष्ठ नागरीक व स्वातंत्र्यसैनिक श्री सारंगाप्पा बसाप्पा दरगु मोदी यांच्या कडील दरगु मोदी पुरातत्व संग्रहातील संस्कृत हस्तलिखितातून बाराव्या शतकापासून पुढील नंदीग्राम येथील घटनांची नोंद लक्षात येते. हस्तलिखित पृ.क्रं.१ वर कल्याण क्रांतीचे प्रणेते म. बसवेश्‍वर स्थापन केलेल्या अनुभवमंटपामध्ये ‘सूरय्या’ नावाचा सत्शीलशरणभक्त होता. त्याचा उल्लेख ‘बसवपुराणात — सुरीयचमडार्यनामा हयासीद् भक्ताग्रणी।’ (बसवपुराण अध्याय ३१) शरण सुरय्या अनुभवमंटपामध्ये ‘दासोहप्रमुख’ म्हणून सेवारत होते. सर्व शरणांचे दासोह अर्थात् भोजन प्रसाद झाल्यानंतर प्रसाद सेवन करीत असे. सूरय्या व कंधार (जि.नांदेड) चे मठाधिपती श्री उरलिंगदेवाच्या गोदावरीच्या तीरावर बसलेले नंदवाड संध्याचे नांदेड येथे केलेल्या इष्टलिंग पूजाविधीचा उल्लेख,

उदगीरचे कै. श्री राजेन्द्र जिरोबे ‘श्री बसवेश्वर व पददलित शिवशरण’ या पुस्तकात करतात. तर भालकीचे कै. ॲड. महेश शंकरअप्पा नागुरे यांनी ‘लिंगतत्त्वदर्पण’ पुस्तकात वरील घटनेचा उल्लेख आहे.

नंदीवाड, नंदवाड, नंदीतट, नांदीयाड, नंदीयड म्हणजे सध्याचे नांदेड असा उल्लेख मराठी वीरशैव विश्वकोष खंड ०१ प्राचीन वाङ्गमय भागात श्री सुधाकर मोगलेवार करतात. अशा या प्रसिध्द् महाराष्ट्रातील शरणाच्या जीवनावर प्रकाश टाकणारा एकही ग्रंथ उपलब्ध नाही, म्हणून नंदी फाउंडेशन, नांदेड व सिध्द्री पब्लिकेशन हाऊस, नांदेड यांच्या माध्यमातून हा लेखपूष्परुपी प्रयत्न होय.

# २. शरण सूरय्या: जन्म व बालपण

नंदीग्राम येथील सधन व्यापारी श्री शिवाप्पा व सौ. पार्वतीबाई सुखपूर्वक राहत होते. शिवाप्पा कडे २१ प्रकारचे व्यापार होते यात सुवर्णालिकारापासून लोखंडापर्यंत सर्वच वस्तुचे व्यापार होते. संपूर्ण परिवार शिवाप्पा व सौ. पार्वतीच्या विवाहाने सुखी झाले होते. या दापंत्याच्या उदरी पाच कन्यारत्न जन्माला आली. या पाच कन्यानंतर एक पुत्ररत्न श्रावण शु. ०३, शालीवाहन शके इ.स. ११३५ रोजी जन्माला आले. (शरण सूरय्यांच्या जन्माच्या वर्षाविषयी तीन संदर्भ श्री सारंगाप्पा दरगु मोदी यांच्या लेखनसंग्रहात आढळतात — इसवी सन ११०९, ११२३ व ११३५) अपत्य मातेच्या उदरात असताना सातव्या महिन्यात जंगमदेवाकडून लिंगधारणा करण्यात आली. जन्मलेल्या अपत्याचे बाराव्या दिवशी नामकरण करण्यात आले — ‘सूरय्या’. सूर्याप्पा, सूर्य, सूरीय, सूरीयचमड, सूय, सूय्य असे विविध नामे सूरय्यांकरीता उपयोजिले आहेत. त्यापैकी सूरय्या हे नाव प्रसिध्द व लोकरूढ झालेले आहे.

सूरय्याचे दुग्धपान, जलपान करण्यापूर्वी भस्मधारण लिंगप्रसाद दर्शन माता पार्वती करीत असे. दिवसेनदिवस

सूरय्या मोठा होत होता. सूर्यदर्शन, जंगमदर्शन, प्रसादग्रहण इत्यादी संस्कार संपन्न होत होते.

शिवाप्पाचा व्यवसायही वृध्दींगत होत होता. बालकाच्या बालक्रीडा पाहून सर्वजण आनंदी होत होते. तो रांगत असताना जसा नंदीबैल ऐटीने चालतो तर कधी डावा खांदा वर करून मधून मधून वळून मागे पाहतो तसा तो रांगत असे. डोक्यावरील कुरूळे केस काळेभोर होते. गळयात मोत्याची माळ, रूद्राक्ष, दोन्ही दंडावर बाजुबंद, हातात मनगटया, पायात मधुर ध्वनी करणारे पैंजण, रेशमी वस्त्र यामूळे बालक राजपूत्रासमान दिसत होता.

शिवाप्पा पार्वती शिवपूजा ध्यान धारणा करीत असताना सूरय्या त्यांच्या जवळ खेळत असे. कळत न कळत त्याच्यावर शिवसंस्कार रूजु लागले. तो भस्मधारण करू लागला. गळयातील लिंग, रूद्राक्ष यांची सुरय्याला विशेष आवड होती. तो सुध्दा शिवपूजेमध्ये सहभागी होऊ लागला. दररोज घरातील ज्येष्ठ व जंगमदेव सुरय्यास अक्षरज्ञान व अंकगणिताचे ज्ञान देत होते. सूरय्या अतिशय तीक्ष्ण बुध्दीचा असल्यामूळे तो तात्काळ ज्ञान ग्रहण करीत होता.

बालक रांगु लागला हळुहळु चालु लागला. बालपणापासून शिवभक्तीचे लक्षणे त्यामध्ये दिसून येते होती, तो एकटा मांडी घालून ध्यानास बसत असे,

बालसुलभ क्रीडासह त्याची ध्यान धारणेची विशेष रूची त्याच्यातील विशेषत्वाची जाणीव करून देत होती. मुलाचा उत्साह पाहुन शिवाप्पाने वयाच्या पाचव्या वर्षी सूरय्याला श्री गुरू ईश्वरय्या, लासिन मठ, वसमत यांच्याकडे घेऊन गेला. बैलगाडीने एक दिवसाचा प्रवास करीत सर्व परिवारजण सांयकाळी लासिन मठात पोहचेले.

बालक सूरय्या मात्र मठातील सर्व वातावरण पाहून भारावून गेला. तेथे त्याला श्री सिध्देश्वराची भव्य पिंड, त्यासमोर भव्य असा नंदी, स्वाध्याय करणारे विदयार्थी, मठासमोर भव्य आवारातील पशुधन, शिवनाम जप करणारे साधक असे सात्विक वातावरण दिसले.

शिवाप्पाने सपत्नीक पूत्रासह सर्वांनी श्री गुरूंचे दर्शन घेतले. गुरूवर्यांनी शिवाप्पाला येण्याचे प्रयोजन विचारले, त्यावर शिवाप्पाने मुलाला आपण दीक्षासंस्काराने अनुगृहीत करून पुढील शिक्षणाकरीता आपल्याजवळ ठेवावे, अशी विनंती केली. श्रीगुरूंनी श्रावण मासानिमित्त शिवदीक्षासंस्कारविधी करू, अशी शिवाप्पाला आज्ञा केली. त्याप्रमाणे शिवाप्पा परिवार व मठातील शिष्यमंडळी पूजासामुग्री एकत्रित करण्यात मग्न झाले. बाळ सूरय्याला पाहून श्री गुरूंना आनंद झाला.

शिवदीक्षासंस्काराचा दिवस उजाडला सर्वांची लगबग सुरू झाली. शिवमंटप तोरण, फुले, माळांनी

सजविण्यात आला होता. मंगलवादय वाजत होती. सकाळी श्री सिध्देश्वर व श्री गुरूंची ईष्टलिंगपूजा झाल्यानंतर मठाच्या भव्य प्रांगणात दीक्षासंस्कार विधी प्रारंभ झाला. सूरय्याने आपल्या गुरूसमोर श्लोक उच्चारला —

भो कल्याण महाभाग शिवज्ञानमहोदधे ।
आचार्यवर्य संप्राप्तं रक्ष मां भवरोगिणम्।।

असे म्हणून श्री गुरूंना साष्टांग प्रणिपात करीत सूरय्याने श्री गुरूंना दीक्षासंस्कार करण्याची विनंती केली. बालकातील शक्तीपात व जिज्ञासुवृत्ती पाहून श्री गुरूंनी सूरय्यावर श्रावण मासातील व्दितीया तिथीस ईष्टलिंगदीक्षासंस्कार केला. आजही लासिन मठात हा पारंपारिक दीक्षासंस्कार संपन्न होतो. दीक्षा — अर्थात् 'दी' दीयते च शिवज्ञानम् 'क्षा' क्षीयते पाशबंधनम् । अर्थात् या संस्कारात पाशबंधनांचा क्षय होऊन शिवज्ञान प्रदान केले जाते, म्हणून या संस्कारास 'दीक्षा' असे म्हणतात.

विधीवत दीक्षासंस्कार संपन्न झाल्यानंतर सूरय्याने श्री गुरू, श्री सिध्देश्वर व मातापिता या सर्वांना आदरपूर्वक नमस्कार केला. विधीनंतर सर्वांनी प्रसाद घेतला. अशाप्रकारे दीक्षाविधी संपन्न झाल्यावर मोठया कष्टाने बाल सुरय्याला मठात शिक्षणाकरीता ठेवून माता पार्वती व शिवाप्पांनी श्री गुरूंची आज्ञा घेतली.

# ३. शिक्षण व युध्द्कौशल्य

सूरय्याचे मठातील नियमाप्रमाणे शिक्षण प्रारंभ झाले. सकाळी लवकर उठणे, स्नानादि आटोपून ईष्टलिंगपूजा करणे, व्यायाम, दंडबैठका, मल्लविदया, तलवारबाजी या सर्वांचा अभ्यास सकाळी होत होता. तर दुपारी प्रसादानंतर संस्कृत ग्रंथाचे अध्ययन केले जात होते. शिक्षा, व्याकरणादि वेदांग, शैवागम, वेदांतादि दर्शने, सूत्रग्रंथ, साहित्य, विविध कला, संगीत व अर्थशास्त्र इत्यादीचे विशेष अध्ययन केले. सायंकाळी श्री गुरू व छात्र यांच्यामध्ये संवाद होत असे. तर रात्री प्रसादानंतर शिवभक्त व शिवकथांचे श्रवण होत होते. अशाप्रकारे मठातील शिक्षण १२ वर्ष पूर्ण झाले. आता सुरय्या १७ वर्षाचा नवतरूण झाला. ज्याने शास्त्र व शस्त्र या दोनही विदयामध्ये नैपूण्य हस्तगत केले होते. श्रीगुरूंनी सूरय्याची बौध्द्रीक, शारीरिक, शस्त्रविदया, मानसिक, व्यावहारिक क्षेत्रातील विशेष परीक्षा घेतली. या परीक्षामध्ये तो यशस्वी ठरला.

श्रीगुरूंचा प्रिय शिष्य सूरय्या गुरूवर्यांसह नंदीग्रामकडे निघाला. नंदीग्रामला ही बातमी कळताच शिवाप्पा व पार्वती खुप आनंदीत झाले. त्यांनी गावात

तोरणे उभारली, गावातील प्रत्येक घरासमोर श्री गुरूंच्या स्वागतासाठी रांगोळी घालण्यात आली, तोरणे उभारण्यात आली, मंगलवादयांचा मधुर ध्वनी, शंखनांद, नगारे, घोष वादये निनादु लागली. श्री गुरूंचे नंदीग्रामच्या सीमेवर शिवाप्पा व परिवाराने चरणप्रक्षालन केले. मातापिता आपल्या पूत्राला पाहून आनंदीत झाले. श्री गुरूंसह सर्वजण शिवाप्पाच्या घरी आले, व्दारासमोर श्री गुरूंची पादोदक व आरती करून भव्य स्वागत करण्यात आले. श्री गुरूसोबत सुरय्याला पाहण्यासाठी सारा गाव उत्सुक होता. पाचही बहिणी आपल्या भावाला पाहून भावविभोर झाल्या. बहिणींनी भावास ओवाळून स्वागत केले. त्यानंतर सर्वांनी प्रसाद सेवन केला. आज जणु नंदीग्राममध्ये दिवाळी साजरी केली जात होती. श्री गुरूंच्या प्रती कृतज्ञता शिवाप्पा व पार्वती यांच्या नेत्रांतून ओसंडून वाहत होती तर दुसरीकडे पूत्राला पाहून आंनदाश्रु थांबविणे शक्य नव्हते. अशा आनंदमय वातावरणात मातापित्यांनी श्री ईश्वरय्या यांच्याप्रती आपला कृतज्ञता भाव व्यक्त केला.

आता सुरय्याचा दिनक्रम नियोजित होता, तो दररोज सकाळी लवकर उठून व्यायाम, शस्त्रास्त्राभ्यास, मल्लविदयेचा अभ्यास करीत असे. त्यानंतर स्नानपूजादि करून प्रसाद सेवन करीत असे. त्यांनतर तो पित्याचा व्यवसायामध्ये मदत करू लागला. शिवाप्पा आपल्या

पूत्राला दररोज व्यापारातील धडे शिकवू लागला. आता सूरय्या व्यापारात पारंगत होत होता. त्याने वर्षभरात आपल्या पित्याचा संपूर्ण व्यापार सांभाळला.

शिवाप्पा हा सात्विक व्यापारी असल्यामूळे त्यांच्या रोजच्या पंक्तीला किमान २० ते २५ सदगृहस्थ, व्यापारी, जंगम, भक्त प्रसादाकरीता असत. 'अतिथी देवो भव' ही शिवाप्पा व पार्वती यांची धारणा होती. त्यांच्या या सत्शील वृत्तीमूळे शिवाप्पाकडे व्यापारी, जंगम, संत, सरदार, सेनापती इत्यादींचे नेहमीच येणे असायचे.

कंधार येथील प्रसिध्द मठाचे मठाधिपती श्री उरलिंगदेव आपल्या शिष्यासह चैत्र शु. ०५ या तिथीला नंदीग्राममध्ये व्यापारी शिवाप्पा यांच्या घरी आले. श्री उरलिंगदेवांचे नंदीग्राममध्ये भव्य स्वागत करण्यात आले. ग्रामातील मुख्य रस्त्यावर केळीचे खांब, नारळाची तोरणे उभारली होती. फुलापानांनी सर्व परिसर सुगंधित व सुशोभित करण्यात आला होता, मंगलवादयांचा नाद निनादत होता.

श्रीगुरू उरलिंगदेवांचे सायंकाळी आगमन झाले, ग्रामस्थांनी श्रीगुरूचे सस्नेह स्वागत केले. स्वागताचा स्वीकार करीत श्री उरलिंगदेव शिवाप्पांच्या निवासी पोहचले. शिवाप्पा पार्वती, सूरय्या व त्यांच्या बहीणींनी श्री

उरलिंगदेवांचे घराच्या मुख्य दरवाज्यावर पादपूजन, आरती करून स्वागत केले.

'साधू संत येती घरा तोचि दिवाळी दसरा' ही उक्ती आज सूरय्या अनुभवत होता. तर श्री उरलिंगदेवांचा शिष्य एक भक्तभंडारी बसवण्णांचे वचन मधुर आवाजात म्हणू लागला —

माझ्या घराशी येतील प्रथमगण —शिवशरण
गुढीतोरण बांधून घरदार सजवीण।।१ ।।
सडा घालु अंगणात रांगोळयाने सजवीन।
'उदो चांग भला' म्हणोन करू स्वागतासि।।२।।
शरण माझे घरी येता धन्य होवू दासोहाने।
तया शेषप्रसादाने होवू समाधानी।।३।।
शेषप्रसाद तो त्यांचा करी सांभाळ आमुचा
कुडलसंगम देवा। तुमचा म्हणून शरण दास।।

या मंगल वचनाने सर्व सद्भक्त भावविभोर झाले. शिवाप्पा, पार्वतीबाई सूरय्या सर्वांनी घरातील सर्व कुटुंबासह गुरू उरलिंग देवांचे स्वागत करून त्यांना भव्य अशा बैठकीत सिंहासनावर आसनस्थ होण्याची विनंती केली. महाराजांनी सर्वांना आशीर्वाद, प्रसाद दिला. श्री उरलिंगदेवांनी सर्वांचे कुशल विचारले.

**ऐतिहासिक लिंगार्चना उत्सवः**

शिवाप्पांनी व सूरय्यांनी गुरू महाराजांना स्नान पूजा करण्याची सविनय प्रार्थना केली. गुरूमहाराजांनी आज्ञा देताच घरातील पार्वतीसह सर्व सुहासिनींनी स्नानाची तयारी केली, महाराजांना उटणे लावण्यात आले, अभ्यंग स्नानानंतर श्री उरलिंग देव देवपूजागृहामध्ये गेले. विशाल अशा पूजागृहामध्ये शिवाप्पांचा सर्व परिवार, ग्रामस्थ सर्वजण उपस्थित होते. श्री उरलिंगदेवांनी ईष्टलिंगपूजा प्रारंभ केली, प्रथम गुरूवंदना, भस्मधारणा, रूद्राक्षधारण, ईष्टलिंगाभिषेक, बिल्वार्चना, पुष्पार्पण, धूप, दिप, नैवेदय, मंगलारती, जप, तीर्थ व प्रसाद अशा क्रमाने सर्वांनी श्री गुरूंच्या समवेत ईष्टलिंगपूजन केले. पूजेनंतर सर्वांनी प्रसाद ग्रहण केला. शिवाप्पा व पार्वतीने सर्वांच्या शेवटी प्रसाद स्वीकारला आजही ८५० वर्षापासून ही परंपरा या परिवाराने जोपासली आहे, सर्व अतिथींचे दासोह झाल्यानंतर घरातील कर्ता पुरूष व स्त्री दासोह स्वीकारतात.

दासोह प्रसादानंतर श्री उरलिंगदेवांनी समस्त भक्तांना वचनसाहित्य, महात्मा बसवण्णांचा कायक सिध्दांत, कार्यपध्दती इत्यादींचा सांगोपांग परिचय करून दिला. शिष्यांने मधुर आवाजात म.बसवण्णांची मंगलवचले गायली व त्यांचा भावार्थ समजून सांगितला. सूरय्याने

अतिशय चिकित्सकवृत्तीने गुरूवर्यांना अनेक प्रश्न विचारले. त्याच्या जिज्ञासुवृत्तीचे श्री उरलिंगदेवांनी कौतुक केले. ग्रामस्थांनी शिवकीर्तनाचा कार्यक्रम केला, अशाप्रकारे संपूर्ण रात्र शिवजागर करण्यात आला.

हा सर्व शिवपूजा, शिवजागराचा कार्यक्रम रंगलेला असताना रात्रीच्या प्रथम प्रहरीच एक चोर शिवाप्पाचा वैभवसंपन्न वाडापाहून चोरीकरीता वाडयाच्या गच्चीवर दडून बसला होता. हा चोर आंध्र प्रदेशातून नांदेडला आला होता. घरातील परिस्थिती व रात्री कोणत्या भागातून घरात शिरून चोरी करता येईल, याचा अंदाज घेण्यासाठी दिवसा भिक्षा मागण्यांचे सोंग घेऊन नंदीग्राम गावात तो फिरत होता. पेद्दी अर्थात् तो चोर ठरविल्याप्रमाणे काळोख होण्यापूर्वीच गच्चीवर दडून बसला. रात्री त्याने शिवपूजा, शिवकीर्तन, वचन इत्यादी मध्ये मग्न असलेला परिवार गच्चीवरील झरोक्यातून पाहिला. या ईष्टलिंगपूजेच्या दर्शनाने त्या चोराच्या मनावर विलक्षण परिणाम झाला, आतील शिवत्व जागृत झाले. सत्प्रवृत्तीने दुष्प्रवृत्तींवर मात केली.

सर्व शिवभक्ताबरोबर त्यालाही शिवपूजेचा आनंद प्राप्त झाला, त्याच्याही कर्णपटांना मंगल अशी वचने, शिवकीर्तन ऐकावे लागले. सकाळ कधी झाली कोणास कळाले सुध्दा नाही. अखेर चोरास चोरी करता आली

नाही. तो अतिशय अस्वस्थ होता. इकडे श्री उरलिंगदेवांनी प्रात:काळी स्नान, पूजा, प्रसाद केला व ते सर्व सद्‌भक्तांना मंगलाशीर्वाद देवून परत कंधारच्या दिशेने निघाले.

परंतु शिवपूजेच्या प्रभावाने ज्याचे मन परिवर्तित झाले, असा तो चोर मात्र श्री उरलिंगदेवांच्या मागोमाग कंधारला पोहचला. हाच चोर पूढे प्रसिध्द शरण श्री उरलिंगपेद्‌दी म्हणून प्रसिध्द झाला. त्यांनाच श्री उरलिंगदेवानी आपल्या गादीचा वारस म्हणून नेमले होते. आजही महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेशामध्ये श्री उरलिंगपेद्‌दींचे मठसंस्थान व वचने प्रसिध्द आहेत. या विषयावर संशोधकांनी अधिकचे संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

# ४. अनुभवमंटपातील सेवा

शिवाप्पा व सूरय्या नेहमीप्रमाणे आपल्या व्यापारात रममाण झाले होते. शिवाप्पाबरोबर आता सूरय्यास आजुबाजुच्या परिसरातील लोक, व्यापारी, उदयोजक चांगल्याप्रकारे ओळखु लागले. शिवाप्पाप्रमाणे सूरय्याची सुध्दा आपल्या व्यवसायावर चांगली पकड निर्माण झाली. प्रामाणिकपणे तो आपला कायक करत होता.

एके दिवशी कंधारचे गुरू उरलिंगदेवांचा निरोप आला की, कल्याण येथे भव्यदिव्य 'अनुभवमंटप' नावाची संस्था महात्मा बसवेश्वरांनी उभारली आहे, त्याचे दर्शन घेण्यासाठी जावयाचे आहे. तरी सूरय्याने सोबत असावे असे वाटते'. तेव्हा मातापित्यांची आज्ञा घेवून सूरय्या कंधारकडे निघाला. सायंकाळी कंधारमध्ये श्री उरलिंगदेवाच्या भव्य मठात पोहचला. मठात श्री उरलिंगदेवांचे दर्शन घेतले. स्नानपूजा करून प्रसाद स्वीकारला. कल्याणनगरातील महात्मा बसवेश्वरांचे कार्य ऐकून सूरय्या विस्मित झाला.

सकाळी लवकरच स्नानपूजा प्रसाद झाल्यानंतर सूरय्या व श्री उरलिंगदेव घोडयावर स्वार झाले व कल्याणच्या दिशेने निघाले. प्रवासादरम्यान सूरय्याने अनेक

वचने ऐकली. प्रवास करीत बसवकल्याण नजीक पोहचले असता जागोजागी महात्मा बसवण्णांचा कायक सिध्दांत जनसामान्यात रूजलेला दिसत होता. सर्वत्र समृध्दी होती. जे ऐकले होते, त्याहीपेक्षा जास्त प्रत्यक्ष अनुभवताना सूरय्यास आनंद होत होता.

श्री उरलिंगदेव व सूरय्या दोघेही कल्याण नगरीत पोहचले, त्यांना देशविदेशातून आलेले शरण त्या परिसरात स्वत:च्या कायकात रममाण असलेले दिसले. सूरय्याने पाहिले प्रत्येकजण आपल्या कार्यात रत आहे, तेव्हा तोही शरणांच्या सेवेत रत झाला. कल्याण नगरतील कोणताही शरण दासोह प्रसाद घेतल्याशिवाय राहणार नाही, याची तो काळजी घेत असे. सर्वांच्या दासोहानंतर तो ईष्टलिंगपूजा करून प्रसाद स्वीकारत होता. हा त्यांचा नित्य नियम झाला होता.

अनुभवमंटपात सूरय्या श्री उरलिंगदेवासह सहभागी होत होता. तेथील समानता, विचाराभिव्यक्ती, लोकसहभाग, सामान्यांना समजणारी व्यवहाराची भाषा, पुरुषासह स्त्री शरणींचा सहभाग, वैचारिक मंथन या सर्वांची सूरय्या अनुभूती घेत होते. दासोहसेवेत सूरय्या रममाण झाला.

# ५. कल्याणक्रांतीनंतर जंगमसेवा

कल्याणनगरीत एक विलक्षण घटना घडली आंतरजातीय विवाहामूळे प्रस्थापितांनी शरणांविरुध्द रक्तरंजित नरसंहार करीत अत्याचार करण्यास प्रारंभ केला. या कठीण प्रसंगी सर्वांनी आपल्या प्राणापेक्षा प्रिय वचनसाहित्य वाचविण्याचा, शरण संस्कृती जोपासण्याचा जीवापाड प्रयत्न सुरु केला. शरणांना प्रिय असलेले कल्याणनगर सोडावे लागत होते. महात्मा बसवण्णा कुडलसंगमकडे, चन्नबसवण्णा उळवीकडे, सिध्दरामेश्वर सोन्नलागीकडे (सोलापूरकडे), उरलिंगदेव व उरलिंगपेद्दी कंधारकडे निघाले. याप्रसंगी शरण सूरय्याने आपल्या सोबत १००० जंगमांना घेतले व त्यांचे संरक्षण करीत त्यांना नंदीग्राममध्ये घेवून आला.

नंदीग्राममध्ये सूरय्याने आपल्या शेतजमीनीवर भव्य दासोहप्रसाद व निवासाची व्यवस्था उभारली. हा भाग जंगमांच्या निवासामूळे पवित्र झाला, त्यास 'जंगमवाटिका' असे संबोधिले जात होते. आजही हा भाग 'जंगमवाडी' नावाने नांदेडमध्ये प्रसिध्द आहे. याविषयी अधिकचे संशोधन होण्याची आवश्यकता आहे जेणेकरून या नांदेड भागातील शरण संस्कृतीचे साहित्य, परंपरा यांचा विश्वाला परिचय होईल.

कल्याणक्रांतीनंतर नंदीग्राममध्ये सूरय्या निवास करीत होता. नित्य लिंग, जंगम यांची सेवा करीत होता. कायक सिध्दांताप्रमाणे सूरय्याने संपूर्ण नंदीग्राम संपन्न करून टाकला होता. आता नंदीग्रामामध्ये वचन साहित्याचे पठनपाठन होत होते. शरण सूरय्यांच्या पत्नीचे नाव सौ. उमादेवी होते, वसमत येथील प्रसिध्द व्यापारी परिवारातील उमा कायकात आपल्या पतीची साथ देत होती. उभयदांपत्य शरणांची मनोभावे सेवा करीत होते. सूरय्यांना एकुण ०४ मुली व ०५ मुले होती.

# ६. नंदीग्राम येथे नंदी स्थापना

कल्याणक्रांतीनंतर नंदीग्राममध्ये सूरय्यांच्या नेतृत्वाखाली विविध शरण उत्सव संपन्न होत होते. वैशाख महिन्याच्या तृतीयेस अर्थात् अक्षय्यतृतीयेस नंदीग्राममध्ये भव्य नंदीची स्थापना करण्याचा संकल्प सूरय्याने केला. त्यानुसार सर्व तयारी करण्यात आली भव्य नंदीची मूर्ती तयार करण्यात आली. अक्षय्यतृतीयेस सर्व नंदीग्राम सजविण्यात आले. सकाळी नंदीग्रामातील भव्य चौकात नंदीचे सूरय्या व उमा यांच्या हस्ते षोडषोपचारांनी पूजन करण्यात आले. आजही हा भव्य नंदी — नंदीमठ, जंगमगल्ली, नांदेड येथे गर्भगृहात संरक्षित केलेला आहे.

बाराव्या शतकात नंदीग्राम परिसरात अनेक नंदीची स्थापना करण्यात आली आहे, जसे लहानचा बसवण्णा, येवली बसवण्णा, रायेवाडी बसवण्णा, खिंडीतील बसवण्णा, शिराढोण परिसरातील नंदी इत्यादी अनेक ठिकाणी नंदीची स्थापना करण्यात आलेली आहे. हा एक संशोधकाकरीता अभ्यासाचा महत्त्वाचा विषय आहे. यासर्व परिसरात शरण संस्कृतीची व्याप्ती, साहित्यसंपदा यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. जंगमवाडी परिसरातील

१००० जंगम व स्वत: सूरय्यांच्या अनेक वचनांचा संग्रह या परिसरात असावयास हवा, याचे संशोधन होणे आवश्यक आहे. त्यापैकी काही लोकगीते, सूरय्यांचा वाडा, नंदी यांचे आपल्याला दर्शन होते. परंतु त्यांचे वचन साहित्यही या परिसरात निश्चित असावयास हवे. याकरीता प्रयत्न करणे गरजेचे आहे.

# ७. ऐक्य

शरण सूरय्यांनी नंदीग्रामचा कायापालट केला होता. परिसर संपन्न झाला होता, सर्व मुलीं व मुलांचा विवाह संपन्न करून सूरय्या आता सर्व सांसारिक कार्यापासून परावृत्त होउन आपला पूर्ण वेळ ईष्टलिंग, जंगमलिंग सेवेत देऊ लागला. ध्यान, धारणा करीत असताना किती वेळ झाला याचे भान आता सूरय्यांना राहत नव्हते.

शरण सूरय्यांनी आषाढ शु.०१ इसवी ११९१ रोजी प्रात:काळी ईष्टलिंगपूजा, दासोहप्रसाद केला व चिरसमाधी मध्ये लीन झाले. 'मरण वै नवमी' या उक्तीनुसार सर्वांनी सूरय्यांच्या शरीराचे स्नान घालून पूजन केले. सर्वांनी किर्तन, भजन, वचन गायली, त्यानंतर आरती केली. गोदावरीच्या तीरावर तारातीर्थ नावाचे पवित्र क्षेत्र आहे तेथे शरण सूरय्यांची क्रियासमाधी करण्यात आली. या समाधी उत्सवास सर्व जंगम, परिवारजण, ग्रामस्थ व आप्त सहभागी झाले होते.

आजही जवळपास ८५० वर्षानंतर सूरय्यांच्या काळातील सर्व संस्कार त्यांचे वंशज विधिवत संपन्न करतात. आज नंदीग्राम आजचे नांदेड येथे सूरय्यांच्या वंशातील वंशज श्री सारंगाप्पा बसाप्पा दरगु मोदी आपल्या

परिवारासह सूरय्यांच्या गोशाळेत राहतात. आज सूरय्यांचा प्राचीन वाडा जीर्ण अवस्थेत जुना गंज, नांदेड येथे आहे. या प्राचीन ऐतिहासिक वास्तुचे संरक्षण व संवर्धन होणे आवश्यक आहे.

# शरण सूरय्यांची वंशावळ ११०९ ते २०१७

शिवाप्पा – नंदीग्राम येथील प्रसिध्द व्यापारी

शरण सूरय्या – शैवागम अभ्यास, ईष्टलिंगपूजारत, श्री गुरूसेवा, अनुभवमंटपात दासोहप्रमुख, नंदीग्राममध्ये १००० जंगमाची निवास व्यवस्था, जंगमवाडी स्थापना, नंदी स्थापना.

बसव – श्री लासिन मठ, येथे बिल्वार्चना उत्सवाचा प्रारंभ

वीरदर्या –उज्जैनी महाकाळेश्वराचे १०७ वेळेस दर्शन व ईष्टपूरी श्री काळेश्वर मंदीर स्थापना

सारंग – श्री कुलदैवत दरीदेव यात्रोत्सव

बसवदूर्ग – अतिथीसेवक

दर्यासारंग – सागराध्यक्ष पश्चिम आरमार

बसव – उदयोग

जीवन– श्री हनुमानभक्त व मल्लविदया पारंगत

गुणवंत – श्रीमंत व्यापारी

सारंगा मोदी – सोमा समाधी, गुरू गोविंदसिघजीची नंदीग्राममध्ये सेवा, समाधी पूजन परंपरा, नंदीयुध्द

बसव – उदयोग

खुशाल – उदयोग

धनंवत – व्यापारी

गुणवंत – उदयोग

जीवन — उदयोग

सारंग — उदयोग

बसाप्पा सेठ — श्री गुरूदरबार निर्माण, मंढई लढाई

सारंगा महाजन — हस्तलिखित संग्रह, कलगीकाव्यसंग्रह

बसलिंग — प्रसिध्द औषधी व्यापार

लक्ष्मण — उदयोग

सारंगाप्पा — महाराष्ट्रातील प्रथम व भव्य लिंगायत बोर्डिंग १९४५ ते १९५५ नांदेड. ऐतिहासिक संकलन

रामलिंगाप्पा — संघकार्य

बसवेश्वर — आणिबाणी, जनसंघ, भाजपा, संघ कार्यात सक्रिय सहभाग, प्रसिध्द चित्रकार, शिक्षक

सुदर्शन — उदयोग

शशिकांत — श्री सिध्दांतशिखामणी, शैवागम, वीरशैवसाहित्य, वचन साहित्य, मराठी साहित्य संकलन व संशोधन कार्य, नंदी फाउंडेशनची स्थापना, दरगु मोदी पुरातत्त्व संग्रहालयाची स्थापना, संस्कृत प्राध्यापक

शामसुंदर — प्रजासत्ताक दिन संचलनात सहभाग, जीवन विमा निगम कंपनी — शाखाधिकारी

सुजय — शिक्षण

सुयश — शिक्षण

सिध्देश्वर — शिक्षण

ईशान — शिक्षण

डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची हस्तलिखित

संग्रहास भेट



श्री राजकुमार वाघ, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन

दि.३०.०७.२००६






शरण सूरय्यांच्या निवासस्थानी असलेला हस्तलिखितसंग्रह







शरण सूरय्यांच्या निवासस्थानी असलेला वस्तुसंग्रह



कन्नड भाषेतील वचन



शरण सूरय्यांनी स्थापन केलेला भव्य नंदी



शरण सूरय्यांचे ऐतिहासिक निवासस्थान





नंदी फाऊंडेशन व्दारा संचलित दरगु मोदी पुरातत्व संग्रहालय, नांदेड.

ಬಸವಕಲ್ಯಾಣ ಅಭಿವೃದ್ಧಿ ಮಂಡಳಿ

ಬಸವಕಲ್ಯಾಣ - 585 327. ಬೀದರ ಜಿಲ್ಲೆ.

ಸಂಖ್ಯೆ / ಬಅಮಂ/ 133

ದಿನಾಂಕ :

**GOVERNMENT OF KARNATAKA**
**Basavakalyan Development Board Basavakalyan**

No.BKDB/MUS/CR-70/2008-09/133

Office of the Commissioner
Basavakalyan Development Board
Tripurant I.B., Basavakalyan
Date : 4-9-2008

To,
Shri Shashikant B. Dargu Modi
Lecturer in Sanskrit,
Jana Gunj, Nandigram,
NANDED - 431 604
Maharashtra State

Sir,

Sub : Inspection of rare manuscripts and other old objects regarding

*********

Having come to know that there are very rare manuscripts pertaining to the times of 12th century "Vishwa Guru Basaveshwara of Kalyana", his sharanas, a rare painting of Saranga Modi, a contemporary of Guru Govind Singh at Nanded, the sword used by Saranga Modi, few bronze vessels and other objects in your personal possession, I have visited your residence in Nandigram area of Nanded in the company of our Asst. Executive Engineer and the Museum Consultant on 28/8/2008.

You have kindly shown us all the above objects. It is observed that the rare manuscript written in Modi script and Marathi language refers to Basaveshwara, the names of Sharanas, Anubhava Mantapa, Jangama, Dasoha and the name of Suraiyya, a hither to unknown Sharana, who was responsible for the Dasoha in Anubhava Mantapa. Some of the Kannada and Bhojpuri records are dated from 1713-1910 and deal with Vedic mantras, Aartisangraha, Kavya, Abhangas, Biographies, Ayurvedic medicines, folk songs etc. The "Kul Itihasa" of Dargu Modi family written by Swami Vishwanatha in 1875 deals with the geneology of Dargu Modi family and also refers to various Samsthanas and historical personalities. This rare manuscript focuses on the history between the period of 1100-1875. The sword used by Sarang Modi and the bronze vessels and the painting of Sarang Modi are of a rare nature. Your father and your self have very carefully preserved all these objects and have spent huge amounts for their preservation and conservation.

All these objects well preserved by you deserve to be conserved in a Museum. In this connection in the fitness of things the rarity and the utmost historical value it is better if all these objects are displayed in your ancestral house by the Government which will be a Heritage Museum in Nandigrama. I have also requested the District Collector, Nanded to convert your ancestral house as the Heritage Museum for the benefit of the future generations.

I wish to record my thanks to you and your parents for the good hospitality shown to us at your residence on 28/8/2008.

Thanking you

Yours faithfully,
4/9/08.
O/C (S.M. KENCHANNAVAR)
Commissioner
Basavakalyan Development Board
Basavakalyan

## ಬಸವಕಲ್ಯಾಣ ಅಭಿವೃದ್ಧಿ ಮಂಡಳಿ

ಬಸವಕಲ್ಯಾಣ - 585 327. ಬೀದರ ಜಿಲ್ಲೆ.

ಸಂಖ್ಯೆ / ಬಅಮಂ/ ದಿನಾಂಕ : ____________

GOVERNMENT OF KARNATAKA
**Basavakalyan Development Board Basavakalyan**

No.BKDB/MUS/CR-70/2008-09 / 132 70

Office of the Commissioner
Basavakalyan Development Board
Tripurant I.B., Basavakalyan
Date :4-9-2008

To,
The District Collector
NANDED - 431 604
Maharashtra State

Sir,

Sub : Setting up of Heritage Museum in the former residence of Sri Saranga Modi in Nandigram area of Nanded-regarding.

*********

I have the honour to inform you that the Government of Karnataka have constituted the Basavakalyan Development Board at Basavakalyan, Dist. Bidar for the overall development of Basavakalyan city, its ancient monuments and Museum. It is learnt that the Government of India have sanctioned funds for improving Nanded city in connection with the ensuing GURU TA GADDI in October-November 2008. I have therefore, taken up a study tour to Nanded on 28th and 29th August 2008 along with our Asst. Executive Engineer and the Museum Consultant to study the various works taken up in Nanded city.

During my above study tour I happened to visit the house of Shri Sashikant Modi, an heir of late Shri Saranga Modi, the contemporary of Guru Govind Singh in Nandigram area of Nanded on 28th. He has shown me very rare manuscripts in Modi, Marathi, Sanskrit and old Kannada languages, rare painting of late Saranga Modi, his Sword and few bronze vessels. Shri Shashikanth and his father Shri Basaveshwar Modi, who are heirs of Saranga Modi, are resourceful persons and they have taken every care to preserve these rare records in their house. However these records, paintings, weapons and other objects deserve to be preserved in a Museum where they will be more appreciated by the public. Shri Shashikanth who is a Sanskrit Lecturer is ready to exhibit all the above objects if his ancestral house in Nandigram area of Nanded is converted as a Heritage Museum by the Government. It is said that Shri Saranga Modi worshipped Guru Govind Singh in the same house.

I would, therefore, request you to kindly consider to convert the ancestral house of late Saranga Modi as a Heritage Museum so that all these rare objects can be displayed in the Museum for the benefit of the future generations.

Yours faithfully,




नंदीग्राम व शरण सूरय्या यांचे निवासस्थान असा श्री गणेश उत्सवातील देखावा




नंदी फाऊंडेशन व्दारा आयोजित नंदीग्रामचा सांस्कृतिक वारसा विषयावरील राष्ट्रिय चर्चासत्रात स्मरणिकेचे प्रकाशन श्री बसवेश्वर दरगु व डॉ. विजय तरोडे




नंदी फाऊंडेशन व्दारा आयोजित नंदीग्रामचा सांस्कृतिक वारसा विषयावरील राष्ट्रिय चर्चासत्रात सहभागी संशोधक

# संदर्भ


- www.nandifoundation.com
- राजेन्द्र जिरोबे – श्री बसवेश्वर आणि पददलित शिवशरण, श्री मृत्युंजय शरण साहित्य प्रचारक संघ, मुंबई.७१ १९७१. पृ.११९
- विश्वनाथ स्वामी, जीवनी संस्कृत हस्तलिखित, पृ. १ व २
- दरगु मोदी पुरातत्व संग्रहातील हस्तलिखित संग्रहातील दस्तावेज.
- बसवेश्वर सारंगाप्पा दरगु मोदी, वीरयोध्दा सारंगा मोदी, दै.प्रजावाणी, दिनांक १९.०१.२०१०
- Dargu S.B. Cultural Heritage of Nandigrama, , Uniresearch – International Multidiciplinary E-research Journal, ISSN 2321-4953, Nandi Foundation, Nanded, August 18th 2015.
- H.Thipperudrappa, Basveshwar, Sahiyta Academy, New Delhi. 1982.
- M.Chidanada Murti, Basavanna, National Book Trust, India, New Delhi.1989.
- सारंगाप्पा बसाप्पा दरगु मोदी यांचा दैनंदिनी संग्रह
- कमलबाई महालिंगाप्पा पत्रे यांची व जुना गंज भागातील ज्येष्ठ मंडळींची मुलाखत

NANDI FOUNDATION

H.No.6/3/195 Near Itwara Police Chowki,
Juna Ganj, Nanded.431 604.
Mob. No. : 09405773134.
www.nandifoundation.com